# नियमित दिवाणी दावा क्रमांक ९३/२०२४ मधील निशाणी क्रमांक ६० खालील आदेश

## (MHRT08-000633-2024)

वादी व प्रतिवादी क्र. ०१ ते ०३, ०५ ते ०७ यांना ऐकले. अभिलेख पाहिले.

**०२**. प्रस्तुतचा दावा हा सरस–निरस–मानाने वाटप, निरंतर मनाई व आदेशात्मक ताकीद यासाठी दाखल करण्यात आला आहे. अर्जातील कथनाप्रमाणे दावा मिळकत क्र. ०१ मध्ये ग्रामपंचायत, ताम्हाणे, घर क्रमांक १२० असा उल्लेख परीच्छेद क्रमांक ०१ व ०२ मध्ये टंकलेखानाच्या चुकीमुळे झालेला आहे. वास्तविक दावा मिळकत क्र. ०३ मध्ये ग्रामपंचायत घर क्र. १२० आहे. त्यामुळे, जेथे दावा मिळकत क्र. १ मध्ये ग्रामपंचायत, ताम्हाणे, घर क्र. १२० असा उल्लेख केला आहे ते खोडुन तेथे दावा मिळकत क्र. ०३ अशी दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली आहे.

**०३**. प्रतिवादी क्र. ०१ ते ०३, ०५ ते ०७ यांनी त्यावर त्यांचे म्हणणे दिल्यानंतर वादीने पश्चात बुध्दीने दाखल केल्याचे आक्षेप म्हणणे मांडले आहे. दावा अद्याप प्राथमिक स्थितीत प्रलंबित असल्याचे दिसुन येते. इतर हजर प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे मांडले नाही अगर अर्जावर युक्तीवाद करण्यासाठी कोणीही हजर झाले नाही. त्यामुळे, उभय पक्षकारांमध्ये वादाचे मुद्दे अंतिमतः निकाली काढण्यासाठी प्रस्तुतची झालेली टंकलेखनाची चुक दुरुस्त करणे गरजेचे वाटते. अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल असे दिसुन येत नाही. अर्ज मंजूर केल्यानंतर प्रतिवादींना त्यांची विशोधीत कैफियत मांडण्याची पुर्णपणे

संधी मिळणार आहे. याउलट, अर्ज नामंजुर केल्यास वादीचे जास्त नुकसान होईल असे दिसुन येते. सबब, अर्ज खर्चाच्या अटीवर मंजूर होण्यास पात्र असल्याने मी खालील आदेश पारीत करीत आहे –

**आदेश**

१. अर्ज प्रतिवादी क्र. ०१ ते ०३, ०५ ते ०७ यांना रक्कम रुपये ३००/– इतका खर्च देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वादीने अर्जात मागितलेली दुरुस्ती मुदतीत करुन दुरुस्तीप्रत अभिलेखावर मुदतीत दाखल करावी.

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.09.17 18:34:13 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

**दि. १५/०९/२०२५** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर देवरुख**

**स्थळः देवरुख** **जि. रत्नागिरी.**

| -: **CERTIFICATE** :- | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this pdf file Order are same word as per original Order. | | |
| Name of Stenographer | : | S. A. Bhale |
| Court Name | : | Civil Judge,(J.D.) & J.M.F.C., Deorukh |
| Date of Decision | : | 15/09/2025 |
| Order signed by Presiding Officer on | : | 15/09/2025 |
| Order uploaded on | : | 17/09/2025 |